शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न शासकीय, अशासकीय,
अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याबाबतचे डॉ. धनराज माने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे जा. क्र. उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/२८६७दिनांक. ०१/०३/२०१९ यांचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 267
दि. 02 MAR 2019

d:\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 12867 दि. ०१/०३/२०१९

**तात्काळ अत्यंत महत्वाचे**

01 MAR 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :-** विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याबाबत....

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, **उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी, पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे आज अखेरपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.** यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी आज अखेरपर्यंत अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय / संस्था/ विद्यापीट यांचेमार्फत कळविण्यात यावे.

२. तसेच, डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्ज शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावरुन दि. ०२.०३.२०१९ पर्यंत निकाली काढावेत. कोणत्याही परिस्थितीत संस्था तसेच विभाग स्तरावर अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत.

३. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी विनाआधार या पर्यायाचा वापर करुन, महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचे अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन आधार क्रमांक अपडेट करुन घ्यावा. शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना त्यांचे आधार लिंक बँक खात्यामध्ये देण्यात येणार आहे. सदरची बाब संबंधित विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयांमार्फत कळविण्यात यावी.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याबाबत सर्व संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner